# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०८/०३/२०२५

**आलोसे नितेंद्र काशिनाथ गाढे, शिपाई नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निफाड ता. निफाड, जि. नाशिक यांनी ३५००००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | निफाड पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण ८५/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन -१९८८ चे कलम ७ व ७ (अ)प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | नितेंद्र काशिनाथ गाढे, शिपाई नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निफाड ता. निफाड, जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५००००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३५००००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्या मावशीचे मौजे दिक्षी ता. निफाड येथे गट नं. ३०५ च्या हद्दीखुणा दाखवून नकाशाचे सिट काढून काम पुर्ण करुन देण्याचे मोबदल्यात आलोसे नितेंद्र काशिनाथ गाढे, शिपाई नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निफाड ता. निफाड, जि. नाशिक यांनी उप अधीक्षक भुमी अभिलेख यांचेशी असलेल्या ओळखीचा तक्रारदारावर प्रभाव पाडून स्वत:साठी ४,००,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे नितेंद्र काशिनाथ गाढे, शिपाई नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निफाड ता. निफाड, जि. नाशिक यांनी ४,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती ३,५०,०००/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.७.३.२०२५ स्विकारल्याने त्यांचेविरुध्द दि. ०८.०३.२०२५ रोजी निफाड पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण ८५/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन -१९८८ चे कलम ७ व ७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक | :- | ९९३०९९७७०० |

( मीरा आदमाने)
पोलीस निरीक्षक, ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

Scanned with CamScanner